गुरुवार, दि. २९ मे २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २९३ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## अवकाळी पावसामुळे भुयारी मार्ग बनला स्विमिंग पूल



**परतूर । प्रतिनिधी -** काल रात्री पडलेल्या मुसळधार पावसामुळे परतुर शहरातून आष्टी कडे जाण्यासाठी भुयारी मार्ग तयार करण्यात आला आहे .या मार्गात काल झालेल्या पावसामुळे अक्षरशा साडेतीन ते चार फूट पाणी साचले होते या पाण्यामुळे या भुयारी मार्गास स्विमिंग पूल चे स्वरूप पाहण्यास परतूरकरांना मिळाले .पंढरपूर ते शेगाव हा म ार्ग परतुर येथून पंढरपूरकडे गेला आहे .परतुर रेल्वे स्टेशन पासून आष्टी कडे जाण्यासाठी व पारडगाव कडे जाण्यासाठी उड्डाणपूल तयार करण्यात आला आहे ,तसेच शहरातून आष्टीकडे जाण्यासाठी रेल्वे लोहमार्गाखाली भुयारी मार्ग दुतर्फी तयार करण्यात आला आहे .गेल्या वर्षी देखील या भुयारी मार्गाने पावसाळ्यामध्ये स्विमिंग पूल चे स्वरूप घेतले होते .या भुयारी मार्गातून पाणी बाहेर काढण्यासाठी पश्चिमेस एका विहीर खोदण्यात आली आहे. या भुयारी मार्गाचे पाणी त्या विहिरीत सोडल्या जाते परंतु विहिरीतून कुठल्याही प्रकारचा आऊटलेट नसल्यामुळे हे सर्व पाणी भुयारी मार्गात साचले जाते. भुयारी मार्गाच्या पश्चिमेस डॉक्टर अण्णाभाऊ साठे नगर आहे या भागात देखील भरपूर प्रमाणात पाणी साचले होते व ते पाणी लोकांच्या घरात गेले होते .खरा जर नैसर्गिक इतिहास पाहिला तर असे होते की पश्चिमेकडून येणाऱ्या ओढ्यातून पावसाचे पाणी भुयारी मार्गाच्या पश्चिम दिशेला एक ओढा होता तेवढ्यातून हे पाणी परतुर कडे वाहत होते व गीतांजली हॉटेल समोरील ओढ्यातून हे पाणी पुलाखालून निघून पुढे पान २ वर

बदनापूर तालुक्यातील अतिवृष्टीने नुकसान झालेल्या भागाची जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी केली पाहणी

## वस्तुनिष्ठ पंचनामे करून अहवाल सादर करा

### तहसिलदार, कृषि अधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी यांचे निर्देश

**जालना । प्रतिनिधी -** वस्तुनिष्ठ पंचानामे करून अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी बदनापूर तहसिलदार व कृषि अधिकाऱ्यांना बुधवार (दि २८) रोजी दिले. जिल्हाधिकाऱ्यांनी बदनापूर तालूक्यातील रोषणगाव महसूल मंडळात काल झालेल्या अतिवृष्टीने नुकसान झालेल्या भागाची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी बदनापूर-अंबड विधानसभेचे आमदार नारायण कुचे, तालुका कृषि अधिकारी गोपाल गुजर, प्र. तहसिलदार श्री. तायडे आदींची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि बदनापूर-अंबड विधानसभेचे आमदार नारायण कुचे यांनी मौजे. बाजार वाहेगाव येथील शेतकरी नवनाथ भिम राव लांडगे यांच्या शेतातील अतिवृष्टीने ढासळलेल्या विहीरीची पाहणी केली. तसेच बाजार वाहेगावातील नदीला आलेल्या पुरामुळे झालेल्या नुकसानीची देखील पाहणी केली. तसेच मौजे वाकुळणी येथील शेतकरी गणेश सुदामराव कोळकर यांच्या नुकसानग्रस्त डाळींब बागेची पाहणी केली. तसेच कडोळी येथील नाल्याची



देखील पाहणी केली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी तहसिलदार बदनापूर आणि तालुका कृषि अधिकारी बदनापूर यांना वस्तुनिष्ठ पंचनामे करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. तसेच आमदार नारायण कुचे यांनी अतिवृष्टीने बाधित सर्व शेतकऱ्यांना जास्तीत-जास्त मदत शासनाकडुन उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिले. तसेच अतिवृष्टीमुळे खचलेल्या विहिरासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून तरतुद करण्याचे आश्वासन यावेळी दिले. यावेळी महसुल आणि कृषि विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## माजी सैनिक आणि अवलंबीतांना ३० मेपर्यत नोंदणी करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेमार्फत जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक, वीरमाता, वीरपिता,अवलंबित आणि त्यांचे अनाथ पाल्य ज्यांची जिल्हा सैनिक कार्यालयात नोंद करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक, वीरमाता, वीरपिता, अवलंबित आणि त्यांचे अनाथ पाल्यांचे महाराष्ट्र राज्य सैनिक कल्याण विभाग,पुणे याच्यांमार्फत सर्व डेटा डीजीटलाइझेशन तसेच संगणकीकरण करण्याचे काम सुरू आहे. यासाठी जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक, वीरम ाता, वीरपिता,अवलंबित आणि त्यांचे अनाथ पाल्य यांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील कोणत्याही सेवेचा लाभ घेण्याकरिता www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ३० मे, २०२५ पर्यंत नोंदणी करणे अनिवार्य आहे. याकरिता १०० रूपये फी आकारणे बंद करण्यात आलेली आहे. याकरिता जिल्ह्यातील जास्तीत-जास्त माजी सैनिकांचे आणि विधवा पत्नींचे जिल्हा सैनिक कार्यालयात मोबाईल क्रमांक आणि आधार क्रम ांक उपलब्ध नाहीत अशा सर्वानी आपला मोबाईल क्रमांकासह आधार क्रमांक नावासहित ९२८४३९१६६० या मोबाईल क्रमांकावर पाठवावा. तसेच वरील संकेतस्थळावर नोंदणी झाल्यानंतर प्राप्त झालेला फॉर्म देखील या कार्यालयास सादर करावा. अथवा जिल्हा सैनिक कार्यालय,जालना येथे दि. ३० मे, २०२५ पर्यंत जमा करावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जिल्हा सैनिक कार्यालय, जालना यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

युवा आदर्श

### खेळणी ...

सत्ते विणा कसा जगूं
चव मीठाची अळणी
कुणीही टपली मारतो
करूनि टाके खेळणी
श्रेष्ठीच्या पादुकांवरती
कितीदा घेई लोळणी
निसटून जाई यादीतून
कशी विचित्र गाळणी
दर वेळी नवीन चेहरा
कराल कशी टेहाळणी
सर्व चरित्र बरबटलेले
आमची मात्र हेटाळणी
आमच्या पाठीराख्यात
होऊ लागली फाळणी
तुटलेली नाती जोडली
केली सारखी झाळणी
पाढे वाचता तेचं पुन्हा
करा पापाची उजळणी
सत्ता माळ दुजागळ्या
घालतो मी ओवाळणी
मंत्रीमंडळात एकदाची
लावली बाबा रे वरणी
बदलले ग्रह तारे सारे
सुधारित समय सारिणी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## माहेश्वरी समाजाचा सर्वोत्कृष्ठ जीवनगौरव पुरस्कार जयनारायण करवा यांना घोषित



**जालना । प्रतिनिधी -** म ाहेश्वरी समाजाचा यावर्षीचा सर्वोत्कृष्ठ सन्मान जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ समाजसेवी कृषिधन कंपनीचे चेअरमन जयनारायण करवा यांना घोषित करण्यात आला आहे.

आपल्या कामावरील श्रद्धा, कर्मठता, कृषी उत्पादन कंपनी क्षेत्रात ६० वर्षापासूनचे योगदान, उदारवृत्ती या विविध पैलूंवर जयनारायण हा सन्मान देण्यात येणार आहे. महेश नवमीनिमित्त दि ४ जुन शनिवार रोजी सायंकाळी महेश भवन येथे होणार्या कार्याक्रमात त्यांना हा पुरस्कार हैद्राबाद येथील प्रसिद्ध उद्योजिका सौ. भगवतीदेवी बलदवा, अखिल भारतीय माहेश्वरी महासभेचे उपसभापती अरुणजी भांगडिया व मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहे. जीवन गौरव पुरस्कार घोषित झाल्याबाबतचे पत्र जयनारायण करवा यांना प्रदान करण्यात आले.

त्या प्रसंगी संजय दाड, विजय राठी, शिवप्रसाद गट्टाणी, डॉ. आशुतोष सोनी, संतोष सारडा, उमेश बजाज, पान २ वर

## स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर यांची जयंती साजरी

**जालना । प्रतिनिधी -** प्रखर देशभक्त,विज्ञानवादी विचारवंत, भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात स्वबलिदानाने, साहित्य संपदेंने आणि चैतन्यमयी नेतृत्त्वाने शेकडो तनमनांना स्फूर्ती देणाऱ्या स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर यांची जयंती जालना येथील ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय येथे (दि. २८) रोजी साजरी करण्यात आली.



प्रारंभी ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालयाचे जेष्ठ सदस्य सुधाकर भालेराव व नतून माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक व वाचक माधव ढाकणे यांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. माधव ढाकणे मार्गदर्शन करताना म्हणाले कि, भारतासाठी म हाराष्ट्रातील सावरकर तेजस्वी तारा आहे. सावरकर अत्यंत कठोर व निर्भिड होते. सावरकरांच्या विचारांचा प्रचार-प्रसार व्हावा या दृष्टीने आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे. कुणाल सेवलीकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाम शेलगावकर यांनी तर उपस्थितांचे आभार शैलेंद्र बदनापुरकर यांनी केले. पांडुरंग काळे,कैलासचंद्र सराफ,अरुण जोशी, वैभव गरदास,आशिष उबाळे, प्रशांत गुजर, रावत जैस्वाल, नवल चौधरी यासह वाचकवर्ग उपस्थित होता.

## शिक्षणाचे महत्व समजले तर भविष्य उज्वल होईल-जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ

### महिला सक्षमीकरणासाठी उज्वल सेवाभावी संस्थेचा पुढाकार; हिरकणी पुरस्काराने कर्तबगार महिलांचा गौरव

**जालना । प्रतिनिधी -** तरुणांनी ध्येय प्राप्तीसाठी डोळ्यासमोर टार्गेट ठेवले पाहिजे. त्याशिवाय कोणतेच यश गाठता येत नाही. त्यासाठी प्रत्येकाला शिक्षणाचे महत्व कळाले पाहिजे तरच भविष्य उज्वल होईल असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले.

जालना शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात दि. २६ मे २०२५ रोजी उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने महिला सक्षमीकरण अभियान अंतर्गत हिरकणी महोत्सव आयोजित केले होते. यावेळी उद्घाटक म्हणून जिल्हाधिकारी बोलत होते. दरम्यान व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. राजकुमार म्हस्के, प्रमुख पाहुणे म्हणून जालना शहर महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, पोलीस निरीक्षक सिध्दार्थ माने, शाहीर अप्पासाहेब उगले, छत्रपती शिवाजी महाराज विद्यापिठाचे प्रा. बापूराव बनसोडे, संस्थेच्या अध्यक्षा सौ. करुणा अच्युत मोरे यांची उपस्थिती होती.

राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या आणि सामाजिक उपक्रमात सहभाग घेणार्या कर्तबगार महिलांचा हिरकणी पुरस्काराने गौरव करण्यात आला. राज्यातील शाळकरी मुली आणि महिलावर होणारे बालात्कार आणि छेडछाडीच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी हिरकणी सुरक्षा अभियान सुरु करण्यात आले असून त्याचा शुभारंभ जिल्हाधिकारी




यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी मोफत ड्रायव्हिंग आणि स्वसंरक्षण प्रशिक्षणासाठी लाभार्थी म हिला आणि मुलीची लक्की ड्रा पध्दतीने निवड करण्यात आली. तत्पुर्वी उपस्थित महिलांना दामिनी पथकाच्या टीमकडून स्वसंरक्षण आणि निर्भीडपणे अन्यायाविरोधात न्याय मागण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले. त्यानंतर महिला व बाल कल्याण विभागाच्या अंतर्गत महिलांसाठी सुरु असलेल्या वन स्टॉप सेंटरच्या प्रकल्प प्रमुख वनिता पिंपळे यांनी अत्याचार पिडीत किंवा अडचणीच्या काळता महिलांसाठी असलेल्या योजनेची पान २ वर

## संपादकीय

# स्त्रियांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटना

## चीन भारताचा क्रमांक एकचा शत्रू

भारताचा क्रमांक एकचा शत्रू पाकिस्तान नसून चीन आहे आणि भारताला खरा धोका चीनपासूनच आहे असे विधान १९९८ साली भारताचे तत्कालिन संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांनी केले होते. जॉर्ज फर्नांडिस हे अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात संरक्षणमंत्री होते. २८ वर्षापूर्वी जॉर्ज फर्नांडिस यांनी केलेल्या विधानावर आज अमेरिकन सुरक्षा गुप्तचर यंत्रणेने शिक्कामोर्तब केले आहे. या यंत्रणेने नुकताच एक अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालात त्यांनी नमूद केले आहे की भारताचा मुख्य शत्रू हा पाकिस्तान नसून चीन आहे आणि भारताला खरा धोका चीनपासूनच आहे. भारताने चीनशी सावध वागावे. अमेरिकन सुरक्षा गुप्तचर यंत्रणेच्या या अहवालावर जाणकार लोकांना आश्चर्य वाटणार नाही कारण आंतरराष्ट्रीय आणि सुरक्षा विषयक जाणकार देखील नेहमी हेच सांगत आले आहे की आपला मुख्य शत्रू चीन आहे अर्थात पाकिस्तान आपला शत्रू आहे यात वाद नाही. १९४८, १९६५, १९७१, १९९९ साली आपण पाकिस्तानशी युद्ध केले आणि पाकिस्तानला पाणी पाजले आताही सिंदूर ऑपरेशन मध्ये आपण त्याचीच पुनरावृत्ती केली. पाकिस्तान आपला शत्रू असला तरी प्रत्यक्ष लढाईत पाकिस्तान भारतासमोर टिकू शकत नाही हे अनेकदा सिद्ध झाले आहे. असे असले तरी पाकिस्तान दरवेळी आपली कुरापत काढतो कारण त्यांच्याम ागे चीन आहे. आताही पहलगाम हल्ल्याचा संपूर्ण जगाने निषेध केला तरी चीनने त्यावर अवाक्षर ही काढले नाही इतकेच नाही तर त्यानंतर झालेल्या लढाईतही चीनने पाकिस्तानलाच पाठिंबा दिला आणि पाकिस्तानच्या पाठीशी चीन खंबीरपणे उभा असल्याची ग्वाही दिली. आता अमेरिकन सुरक्षा गुप्तहेर संघटनेने दिलेल्या अहवालावर भारताने कोणतीही प्रतिक्रिया दिली नसली तरी भारत हा अहवाल गांभीर्याने घेणार यात वाद नाही. कारण चीन हा किती विश्वासघातकी देश आहे याचा अनुभव आपण १९६२ साली त्यानंतर वेळोवेळी घेतला आहे. आताही चीन अधूनमधून भारताच्या कुरापती काढतच असतो. भारताचा सख्खा शेजारी असणारा पण भारताला कायम पाण्यात पाहणारा चीन सतत काही ना काही खोड्या काढून दोन्ही देशातील तणाव वाढवत असतो. हे आताच नाही तर १९६२ पासून चालू आहे. १९६२ साली भारताशी मैत्रीचा हात पुढे करून हिंदी चिनी भाई भाई म्हणत त्याने भारताचा केसाने गळा कापला. त्यानंतरही त्याने भारताच्या सतत खोड्या काढून भारताला त्रास दिला. कधी त्याने भारतात घुसखोरी केली तर कधी त्याने सीमेवर नवीन गावे वसवली तर कधी भारतातील गावांना चिनी नावे देऊन ती गावे चीनच्या हद्दीत असल्याचा दावा केला अर्थात चीनच्या या दाव्याला किंवा खोडसाळपणाला भारताने कधी भीक घातली नाही तरीही त्यांचा खोडसाळपणा कमी झाला नाही उलट वाढतच गेला. दोन वर्षापूर्वी चीनने भारतातील लडाख आणि अरुणाचल प्रदेशातील काही गावांना चीनच्या नकाशात दाखवले होते. इतकेच नाही तर त्या गावांना चिनी नावे देखील दिली होती. चीनच्या या खोडसाळपणाची भारताने तातडीने दखल घेऊन त्याचा निषेध केला होता. भारताच्या निषेधानंतरही चीनने भारताच्या खोड्या काढणे बंद केले नाही. मागील वर्षी चीनने भारताच्या लडाखमध्ये दोन नव्या काऊंट्याची घोषणा करत घुसखोरी केली. भारताच्या हे लक्षात आले भारतीय लष्कराने आणि परराष्ट्र मंत्रालयाने याचा चीनला जाब विचारला. चीन एवढ्या वरच थांबला नसून चीनने भारताशी वॉटर वार सुध्दा सुरू केले असून चीनने ब्रह्मपुत्रा नदीवर मोठा जल प्रकल्प सुरू केला आहे या जल प्रकल्पामुळे भारताला भविष्यात मोठ्या जल संकटाला सामोरे जावे लागणार आहे . दुसऱ्यांच्या खोड्या काढून गंमत पाहण्याची चीनची जुनी खोड आहे. अशी खोड तो फक्त भारताचीच काढतो असे नाही तर इतर देशांचीही काढतो मात्र आशिया खंडातील विशेषतः भारताच्या शेजारील काही देशांना त्याने वारेमाप कर्ज देऊन तर काही देशांना धाक दाखवून त्याने गप्प बसवले आहे. भारत मात्र त्याच्या या खेळीला बळी पडत नाही म्हणूनच तो अशा खोड्या अधून मधून काढत असतो. भारताच्या अरुणाचल प्रदेश आणि लडाखवर चीनचा डोळा आहे इतकेच नाही तर अरुणाचल प्रदेश हा आपलाच भूभाग असल्याचा दावा चीनने अनेकदा केला आहे. चीनच्या झाऊझंग येथे पार पडलेल्या क्रीडा स्पर्धेत भारताने खेळण्यास नकार दिला त्यावेळी चीनने अरुणाचल प्रदेशातील खेळाडूंना स्टेपल व्हिसा दिला होता. स्टेपल व्हिसा देऊन त्यांनी एकप्रकारे भारताला डिवचले होते. त्या आधी लडाखमध्ये चिनी सैन्य घुसवले होते तेंव्हा दोन्ही देशातील सैन्य एकमेकांपुढे उभे ठाकले होते केंव्हाही युद्धास तोंड फ ुटेल अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी झालेल्या धुमश्चक्री नंतर चिनी सैन्य भारताच्या हद्दीतून निघून गेले होते. मात्र सीमेवर त्यांच्या हालचाली कायम चालू असतात. मुळात चीन हा जगातला सर्वात कपटी देश आहे. चीनला जगातील महासत्ता व्हायचं आहे त्यासाठी त्याने विस्तारवादी भूमिका स्वीकारली आहे त्यामुळेच तो शेजारील देशांची जमीन आणि मालमत्ता बळकावीत आहे. त्यांच्या या विस्तारवादी धोरणाला जर कोणी आडकाठी आणणार असेल तर तो भारत आहे हे चीन जाणून आहे म्हणूनच तो भारताच्या अधूनमधून खोड्या काढून भारताला त्रास देत असतो अर्थात त्याच्या या खोड्यांना भारत आता बधणार नाही कारण आजचा भारत हा १९६२ चा भारत नसून २०२५ चा भारत आहे. जरी चीनचे लष्करी सामर्थ्य भारतापेक्षा अधिक असले तरी चीनच्या आरे ला कारे करण्याची हिंमत या भारतात आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## पावसाचे रॉयल चॅलेंज!

**मोहाली -** गुरुवारी मोहालीत पावसाची शक्यता आहे, या दिवशी पहिला क्वालिफायर सामना पंजाब किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात मुल्लानपूर क्रिकेट स्टेडियम येथे खेळला जाणार आहे. जिंकणारा संघ अंतिम फेरीत प्रवेश करेल, तर पराभूत संघाला आणखी एक संधी मिळेल आणि एलिमिनेटरच्या विजेत्याशी सामना करेल. पण जर पावसामुळे सामना रद्द झाला तर पंजाबला अंतिम फेरीचे तिकीट मिळेल. तर आरसीबीला अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी क्वालिफायर-२ खेळावे लागेल.

पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणानंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. रुपाली चाकणकर यांच्या कार्याविषयी तसेच महिला आयोग निष्क्रिय असल्याबद्दल चर्चा सुरू आहे. महिला आयोगाने काय कार्य केले आहे याचा डेटा माझ्याकडे आहे पण चिल्लर लोकच जास्त चर्चा करत आहेत असे वादग्रस्त वक्तव्य चाकणकर यांनी केले आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांची ऑडिओ क्लिप सोशल मि डीयावर आल्यावर त्यांच्यावर चहूबाजूंन टीका होत आहे. सुषमा अंधारे,किशोरी पेडणेकर, अंजली दमानिया,रोहिणी खडसे,करुणा मुडे, यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या राजीनामाची मागणी केली आहे.किती प्रकरणात त्यांनी अत्याचारीत म हिलांना न्याय मिळवून दिला आहे जाहीर करावे अशी विचारणा होते आहे. सोशल मीडियावर ही त्यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरत आहे.सोशल मिडीयावर तर अतिशय वाईट वाईट शब्दात खालच्या पातळीवर प्रतिक्रिया येत आहे.एका मोठ्या राजकीय नेत्याचे नाव घेवून सोशल मिडीयावर प्रतिक्रिया येत आहेत. ही दुर्दैवी गोष्ट आहे.

हा आयोग आहे का महामंडळ अशाही प्रतिक्रिया येत आहे. एखादी स्वाभिमानी स्त्री असती तर तिने तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा दिला असता अशीही प्रतिक्रिया अनेकांनी दिली आहे.

केवळ पोलिसांना या प्रकरणात कारवाई करा म्हणून पत्र देणे,किंवा मेल पाठविणे हे महिला आयोगाचे काम नाही तर गुन्ह्यासाठी योग्य ते कलम लावले गेले आहे का ? आणि तपास योग्य दिशा सुरू आहे का ? पोलीसांवर राजकीय दबाव आहे का ? सुद्धा बघायला हवे असे मत व्यक्त केले जात आहे.

दरम्यान राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याचा विषय हा पक्षांतर्गत आहे, अशी प्रतिक्रिया दिली आहे .पिडीत महिलांना न्याय मिळुन देण्यासाठी आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत, असेही म्हटले आहे.

महिला आयोगाच्या अध्यक्षपद तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडीचं प्रदेशाध्यक्षपद रुपाली चाकणकर यांच्याकडे आहे. एका व्यक्तीकडे दोन दोन पदं कशासाठी? चाकणकर यांच्याकडून महिला आयोगाचं



अध्यक्षपद काढून घ्यावं, अशी मागणी पक्षातील एका गटानं केली आहे अशीही माहिती प्रसिद्ध झाली आहे.. चाकणकर यांच्या कार्यपद्धतीवर पक्षात नाराजी आहे. त्यामुळे चाकणकर यांची महिला आयोगाच्या अध्यक्षपदावरुन लवकरच गच्छंती होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्या गोष्टी होतीलच पण

आतां ह्यात महत्त्वाचे आहे ते ह्या अन्याय झालेल्या महिलांना न्याय मिळवून देणे. आणि त्याची निपक्षपातीपणे चौकशी करणे.ही आत्म हत्या आहे का हत्या हा तपास महत्त्वाचा आहे. आणि दोषींवर कडक कारवाई.व्हायला हवी.

या प्रकरणातही या कुटुंबाचा खासदार,आम दार, तसेच राजकीय व्यक्ती यांच्याशी कौटुंबिक संबंध असल्याचे वेळोवेळी सोशल मीडियावर वाचले आहे ऐकल आहे.ही मंडळी त्यांच्या कार्यक्रमास उपस्थित होते त्याचे छायाचित्रै प्रसिद्ध झाले आहे.

जसे बीड येथील संतोष देशमुख हत्या प्रकरणात धनंजय मुंडेंना राजीनामा द्यावा लागला त्याच धर्तीवर या प्रकरणी कोणी संबंधितांनी राजीनामा दिल्याशिवाय निपक्षपातीपणे चौकशी होणार नाही असेही चर्चा होत आहे.

राज्य महिला आयोग महिलांच्या हक्कांचे रक्षण,होणारेअत्याचार रोखणे आणि त्यांच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी काम करते. त्यांच्या कामांमध्ये तक्रारी निवारण, कायद्यांची अंमलबजावणी आणि महिलांच्या विकासासाठी उपाययोजनांचा समावेश आहे.

राज्य महिला आयोगाची रचना अशी आहे की अध्यक्ष सहा व शासकीय सदस्य आणि पदसिद्ध सदस्य म्हणून पोलीस महासंचालक असतात.

आता घडलेल्या प्रकरणामुळे एकंदरीत म ाध्यम आणि सोशल मीडिया वरून जे व्यक्त होत आहेत हे असंतोष आहे तो म्हणजे महिला आयोगाच्या अध्यक्षपदी राजकीय व्यक्ती किंवा महिला यांची नेमणूक नसावी कारण अशी व्यक्ती नेमणूक झालेले असल्यामुळे नाही म्हटले तरी पक्षाच्या एकूण दबावाखाली असते, त्याम ुळे ती निपक्षपातीपणे निर्णय घेऊ शकत नाही, प्रकरणाचा अहवाल देऊ शकत नाही. त्यांची भूमिका व स्पष्ट मत नोंदवू शकत नाही किंवा दुर्लक्ष केले जाते चाल ढकल केली जाते. तेव्हा अशावेळी दोन दोन पद असणाऱ्या राजकीय व्यक्तीकडून कसा न्याय दिला जाईल अशी ही शंका व्यक्त केली जाते आहे .महिला आयोगावर अध्यक्ष म्हणून निवृत्त महिला न्यायाधीश आणि सदस्य म्हणून कुठल्याही पक्षाशी संबंधित नसणारी कायदेशीर ज्ञान असणारी महिला, निवृत्त आय ए एस, आयपीएस, महिला अधिकारी यांची नेमणूक असावी. कारण सदस्य महिला सुद्धा पक्षाशी संबंधित नसाव्यात. अशा महिला सदस्य असल्याचे दिसून येते म्हणजे एकूणच काय तर पक्षातीलच लोकांना कुठल्यातरी जागी नेमणूक करून त्यांना न्याय दिला जातो वर्णी लावली जाते. ही गोष्ट तितकी सत्य आहे आणि नाकारून चालणार नाही. ह्या नेमणूका उच्च न्यायालय, किंवा सर्वोच्च न्यायालया कडून व्हायला हव्यात अशा प्रतीक्रीया मोठ्या प्रम ाणात आहे.

महिलांवरील अन्याय आणि अत्याचार यासाठी येणाऱ्या तक्रारी चौकशी करून योग्य उपाययोजना करणे तसेच महिलाच्या हक्कासाठी असलेल्या कायद्याची योग्य अंमलबजावणी होण्यासाठी राज्य महिला आयोग काम करत असते. सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी राज्य महिला आयोग विविध योजना आणि कार्यक्रम राबवतात यात शिक्षण, आरोग्य, आणि उद्योजकता याचबरोबर महिलांना संरक्षण यासारख्या बाबीचा प्रामुख्याने समावेश असतो. महिलांच्या अधिकार विशेष जागृतीसाठी गावोगावी कार्यक्रम राबवले जातात असे किती प्रमाणात उपक्रम राबविले जातात हा ही मोठा प्रश्न आहे. आज महिला अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे. तसेच अनेक मुली गायब झालेल्या आहेत. निरनिराळ्या जाहिरातीतून महिलांचे शरिराचे उत्तान प्रदर्शन होत आहे. याविषयी महिला आयोगाने आपली भूमिका जाहीर करायला हवी आणि त्याबाबतीत अशा स्त्री शरीराचे देहाची प्रदर्शन करणाऱ्या,विटंबना करणाऱ्यान वरही काहीतरी बंधन आणायला हवे.कारवाई करायला हवी. जेणेकरून समाजात घडणाऱ्या घटना थांबतील.

अर्थातच केवळ महिला आयोगाचेच हे काम नसून शासन प्रशासन जनता ह्यांचा सक्रिय सहभाग हवा. तेव्हाच ह्या दृष्ट प्रवृत्तीचा नाश होईल हे तितकेच खरे. आणि अतिशय महत्त्वाची गोष्ट म्हणजे राजकीय व्यक्ती, नेते, यांनीही वाईट दृष्ट, गुंड प्रवृत्तीच्या लोकांना आश्रय देऊ नये.आमदार, खासदार, मंत्री, यांचे बरोबर फोटो काढणे, कार्यक्रम, उद्घाटनप्रसंगी बोलावणे, लग्नकार्यात बोलावून आपला दबदबा निर्माण करतात. आणि त्यांच्या जोरावरच अशा व्यक्ती असे कृत्य करायला धजावतात. हे आपण अनेक घटनांमधून बघतोय.त्यांनी जरूर विचार करावा



**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जिल्हा जळगाव.**
**मोबाईल नंबर ८९९९५६६९१७**

## गटई कामगारांना लोखंडी पत्र्याचे स्टॉल वाटप योजनेअंतर्गत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील गटई कामगारांना ऊन, वारा, पाऊस यापासून संरक्षण मिळावे आणि त्यांची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी १०० टक्के अनुदानावर पत्र्याचे स्टॉल पुरविण्याची योजना समाज कल्याण विभागामार्फत राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत लाभार्थ्याकडून सन २०२५-२६ या वर्षाकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छूक लाभार्थ्यांनी त्यांचे अर्ज सहायक आयुक्त, समाजकल्याण, जालना या कार्यालयात दिनांक १५ जून २०२५ पर्यत सादर करावेत, असे आवाहन अनंत कदम, सहायक आयुक्त, समाज कल्याण, जालना यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती साजरी



**जालना । प्रतिनिधी -** जिल्हाधिकारी कार्यालयात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती साजरी करण्यात आली. अप्पर जिल्हाधिकारी रिता मैत्रावार यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील उपजिल्हधिकारी नम्रता चाटे, तहसीलदार अनिल नव्हाते, नायब तहसीलदार श्री तायडे, नायब तहसीलदार तुषार निकम, सा.महसूल अधिकारी रवींद्र हेलगट, सा. महसूल अधिकारी अतुल केदार, दिनेश बेराड यांच्यासह इतर अधिकारी-कर्मचारी यांनीही स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून पुष्प अर्पण केले.

## आशासेविका सुरेखा आचलखांब यांना हिरकणी पुरस्कार प्रदान



**जालना । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील नंदापूर येथे कार्यरत असलेल्या आशासेविका सुरेखा आचलखांब (वाकोडे) यांना सोमवार ता.२६ रोजी हिरकणी पुरस्कार प्रदान करण्यात आला.

जालना शहरातील जालना शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात दि. २६ मे २०२५ रोजी उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने महिला सक्षमीकरण अभियान अंतर्गत हिरकणी महोत्सव आयोजित केला होता. नंदापूर येथे सुरेखा आचलखांब (वाकोडे) या आशासेविका म्हणून कार्यरत असून आशा सेविकेच्या माध्यमातून गरोदर मातासाठी शासनाच्या असलेल्या विविध योजना गावात राबवित आहे. अशाच प्रकारच्या संकटात सापडलेल्या एका गरोदर मातेची अपरात्री सुखरूप प्रसुती करून आई व बाळाला शासकिय रूग्णालयात पोहचविले होते. त्याचीच दखल घेत उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने आशासेविका सुरेखा आचलखांब (वाकोडे) यांना हिरकणी पुरस्कार जाहीर केला होता. त्या पुरस्काराचा वितरण सोहळा सोमवार ता.२६ रोजी जालना शहर महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, पोलीस निरीक्षक सिध्दार्थ माने, शाहीर अप्पासाहेब उगले, छत्रपती शिवाजी महाराज विद्यापिठाचे प्रा. बापूराव बनसोडे, संस्थेच्या अध्यक्षा सौ. करुणा अच्युत मोरे यांच्या उपस्थितीत शाल, मानपत्र, ट्रॉफी देऊन हिरकणी पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार मि ळाल्याने आशासेविका सुरेखा आचलखांब यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

पान १ वरुन

### अवकाळी पावसामुळे ...

वाहत होते परंतु जो परतुर मध्ये नैसर्गिक ओढा होता त्या ओढ्याची काही वर्षांपूर्वी नाल्यात रूपांतर झाले, काही वर्षानंतर नाल्याचे नालीत रूपांतर केले. त्यामुळे महादेव मंदिर चौकातून ह्या नाल्यातील पाणी सर्व मुख्य रस्त्यावर येऊन महादेव मंदिराच्या समोरील रोडवर प्रत्येक वर्षी प्रत्येक मुसळधार पाऊस पडल्यानंतर हे पाणी रोडवर येते .त्यामुळे हे पाणी लोकांच्या घरात दुकानात शिरते. प्रशासनाने याबाबत कुठल्याही प्रकारचे ठोक पाऊल उचलून परतूर मेन रोडच्या पश्चिमेस असणारा ओढा सध्याचा नाला हा रिकामा केला नाही ,त्यावरील अतिक्रमण देखील हटवले नाही, त्यामुळे परतूरकरांना ह्या पाण्याचा सामना करावा लागत आहे .तरी संबंधितांनी याबाबतचे गांभीर्य लक्षात घेऊन नाल्यावरील अतिक्रमण दूर करून नाला साफ करावा. असे जर होत राहिले तर एखाद्यावेळी भुयारी मार्गावरील लोहमार्गाला धोका होऊ शकतो .त्यामुळे एखादी घटना घडू शकते ,तरी संबंधितांनी याकडे वेळीच लक्ष देऊन ह्या समस्येचा बंदोबस्त करावा अशी सर्वसामान्य नागरिकांची मागणी आहे.

### माहेश्वरी समाजाचा ...

विजय गो. राठी, राजाभाऊ मंत्री हे उपस्थित होते

महेश नवमी कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरु आहे. बॉक्स क्रिकेट, आरोग्य तपासणी शिबिर अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ४ जून रोजी सकाळी ८.३० वाजता श्रीराम मदिर बडीसडक येथुन भव्य शोभायात्रा निघणार आहे. शोभायात्रा काळात माहेश्वरी समाजाची सर्व प्रतिष्ठाने बंद राहणार आहेत. या शोभायात्रेत जास्तीत जास्त समाज बांधवानी सहभागी व्हावे, असे आवाहन जालना माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष विजय गो. राठी, सचिव उमेश बजाज यांच्यासह शहर कार्यकारणी व प्रभाग पदाधिकार्यांनी केले आहे.

### शिक्षणाचे महत्त्व ...

माहिती दिली. तसेच महिला व बाल कल्याण विभागाचे इंगळे यांनी एकल पालकत्व, लेक लाडकी, बाल संगोपन यासह विविध योजनेची माहिती देत अर्जही उपलब्ध करुन दिले. तर पोलीस अधिक्षक कार्यालयाकडून स्थानिक गुन्हे शाखेचे संजय सोणवने यांनी मुलींना स्वसंरक्षण, सायबर सुरक्षा आणि महिला सुरक्षेच्या संदर्भात मार्गदर्शन केले. त्यानंतर महिलांसाठी आयोजित केलेल्या होम मिनीस्टर कार्यक्रमात महिलांनी पैठणी, चांदीचं नाणं, रोख रक्कम असे विविध बक्षिसं जिंकून आनंदोत्सव साजरा केला. तर शाहीर रामानंद उगले यांचा सांस्कृतीक कार्यक्रम पार पडला.

दरम्यान जिल्हाधिकारी यांनी आपल्या भाषणातून महिला सक्षमीकरणाच्या संदर्भात मार्गदर्शन केले. मराठवाड्यात महिला सक्षमीकरणाची अत्यंत गरज असून अनेकांच्या मानसीकतेत बदल करण्यात गजर आहे. आणि त्या दृष्टीने उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्था सक्रीयपणे काम करत आहे. मराठवाड्यात म हिलांच्या बाबतीत कमी असलेले लिंग गुणोत्तर, मुलीचे शिक्षण, लग्नाचे वय, मुलीचे घरातील तसेच समाजातील स्थान, काम करण्याच्या ठिकाणचे स्थान, प्रॉपर्टीमध्ये स्थान यावर काम झाले पाहिजे. सामाजिक विचार करुन महिला आपल्या प्रॉपर्टीवरील हक्क सोडून देतात.परंतु, तीने जर प्रॉपर्टी मागीतली तर घरात वाद सुरु होतात. दोन मुला-मुलीतील भेदही पहायला मिळतात, कुणाला कीती शिकवायचे हे त्या कुटुंबाच्या मानसीकतेवर अवलंबून असते. मुलीला काहीहीही शिक्षण भेटले तरी छान म्हणून पुढे घेऊन जातात. मात्र मुलाच्या अनुषंगाने त्याला हवं ते जोपर्यंत भेटत नाही, तोपर्यंत रिपीट प्रयत्न करायला सांगता. त्याच्यासाठी घर गहान ठेवण्याची तयारी देखील असते. त्यामुळे त्यांच्या मानसीकता बदलन्यासाठी शासन प्रयत्न करीत असले तरी त्यात संस्थांचा महत्वाचा रोल आहे. असेही जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सांगीतले.

**मुली आणि महिलांना मोफत स्वसंरक्षण व चारचाकी वाहन प्रशिक्षण**

या हिरकणी सुरक्षा अभियानाच्या माध्यमातून मुली आणि म हिलांना स्वसंरक्षणाचे धडे दिले जाणार असून लोकसहभागाच्या माध्यमातून १०० मुलींना मोफत ड्रायव्हिंग प्रशिक्षण देऊन महिला वाहनचालक तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्याचा शुभारंभ जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते चिठ्ठी काढून लक्की ड्रॉ पध्दतीने सुरु करण्यात आला आहे. यावेळी चिठ्ठी काढून काही मुलींची चारचाकी वाहनचालक प्रशिक्षणासाठी मुलींची निवड करण्यात आली. शाळकरी मुलीवर आणि टॅक्सी चालकाकडून महिलावर होणारे बालात्कार कमी करण्यासाठी महिला ड्रायव्हर घडविण्यात येत आहेत. त्यासाठी मुलींना आणि महिलांना मोफत चारचाकी वाहन प्रशिक्षण देऊन त्यांना स्वसंरक्षाणाचे प्रशिक्षणही देण्यात येत आहे.

# शासकीय गायरान जमीनीवरील अतिक्रमण धारकाची माहिती तहसीलदार यांनी परिपुर्ण द्यावी

## सामाजिक संघटनाच्या वतीने मागणी

**परतूर । प्रतिनिधी -** शासकीय गायरान जमीनीवरील अतिक्रमण धारकाची माहिती जिल्ह्यातील तहसीलदार देण्यास टाळाटाळ करीत असून याबाबत त्यांच्याकडून परिपुर्ण द्यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुभाष मुंडे (बाबा ) यांनी निवासी जिल्हा अधिकारी यांच्याकडे केली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले कि विविध सामाजिक संघटनेच्या वतीने गायरान जमीनी कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावे होणे बाबत. तसेच वेळोवेळी यापूर्वी हि अनेक मोर्चे, आंदोलन केलेले आहे. त्या अनुषंगाने मागील पावसाळी अधिवेशनात मुख्यंमत्री देवेंद्र फडवणीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गायरान धारकाची माहिती मागून घेऊन आपणास योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न करु असे आश्वासन दिले होते. त्याप्रमाणे माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जालना येथे जाहिर सभेत देखील या बाबतची घोषणा केली होती. मात्र याबाबत स्थानिक अधिकारी निष्क्रियपणे आपली भूमिका बाजावत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. आपण पुन्हा सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना आदेश देऊन सर्व गायरान जमीनीची सद्य परिस्थिती प्रत्येक ग्राम महसुल अधिकारी यांच्या कडून प्रत्यक्ष जागेवर जावून व गाव नमुना १-ई ला नोंद घेण्यात यावी व योग्य ती माहिती शासनास सादर करावी सदर प्रकरणात तहसीलदार व ग्राम महसुल अधिकारी यांनी शेरा कोठेही लिहीला नाही. यामुळे सदर माहिती ही अपूर्ण सादर होऊन आम्हाला न्याय मिळणार नाही. असे निवेदनात नमूद करत आपण गायरान जमीनीची माहिती शासनास सादर करते वेळी महसुल ग्रामविकास अधिकारी यांना प्रत्येक जमीनीचा पंचनामा व इतर अहवाल मागून योग्य तो अहवाल शासनास सादर करावा अशी मागणी करण्यात आली आहे



त्या अनुषंगाने जालना कार्यालय कक्ष अधिकारी यांचे पत्र आपणास प्राप्त झाले आहे व त्या अनुषंगाने आपणही जालना जिल्हयातील सर्व तहसीलदाराकडून माहिती मागितली आहे. ती संपुर्णतः चुकीच्या पध्दतीने सादर केल्याचे आमच्या निर्देशनास आल्यामुळे

सद्य पस्थितीथी जे प्रस्ताव आपणाकडे तहसीलदार यांनी सादर केले आहे. यामध्ये अनेक त्रुटी असल्यामळे आपण पुन्हा एकदा मा. उपविभागीय अधिकारी अंबड, परतूर यांना पत्र देऊन रितसर अहवाल मागवून घ्यावा ही रास्त मागणी शेवटी निवेदनात करण्यात आली.

# जयंतीनिमित्त शिवसेनेच्यावतीने स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन



**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रभक्ती, क्रांतिकारक विचार आणि तेजस्वी लेखनाने देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात अमूल्य योगदान देणारे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना शहर शाखा जालनाच्यावतीने स्वातंत्र्यवीर सावरकर चौक येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमास आमदार अर्जुन खोतकर यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या क्रांतिकारी कार्याला अभिवादन केले. यावेळी युवासेना सचीव अभिमन्यू खोतकर, भारतीय जनता पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, अशोक पांगारकर, माजी सभापती पांडुरंग डोंगरे, रविंद्र देशपांडे, भगवान पुराणिक, योगेश रत्नपारखे शुभम टेकाळे, सिद्धिविनायक मुळे, दीपक वैद्य, ॲड. कुणाल जाधव, अंकुश पाचफुले, संजय गायकवाड, संजय घोडे निरज मंत्री, गोविंद सोनवणे यांच्यासह शिवसेना पक्षाचे शहर व जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात सावरकरांच्या विचारांचा जागर करण्यात आला.



**भाजप जालना महानगर जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल भास्कर दानवे यांचा माजी मंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर, शिवसेना जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब घुगे आदींची उपस्थिती होती.**

# स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीनिमित्त भाजपा जालना महानगरतर्फे अभिवादन

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी जालना महानगरच्या वतीने महान स्वातंत्र्यसैनिक, क्रांतिकारक, विचारवंत आणि हिंदुत्वाचे प्रखर पुरस्कर्ते स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त (ता.२८) रोजी पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

हा कार्यक्रम भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. उपस्थितांनी सावरकरांच्या जीवनकार्याला अभिवादन करून त्यांची आठवण काढली. कार्यक्रमात बोलताना भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, स्वातंत्र्यवीर सावरकर हे केवळ क्रांतिकारक नव्हते, तर एक प्रतिभावान लेखक, समाजसुधारक आणि राष्ट्रप्रेमाने भारलेला नेता होते. त्यांचं विचारमंथन आजच्या पिढीने समजून घेणे आवश्यक आहे. या कार्यक्रमाला भाजपा जालना महानगरमधील अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते, युवा मोर्चा, महिला मोर्चा व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन देशभक्तीपूर्ण वातावरणात पार पडले.





कार्यक्रम प्रसंगी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, बद्रिनाथ पठाडे, अशोक अण्णा पांगारकर, विजय कामड, सोपान पेंढारकर, सुनिल पवार, सुनिल खरे, अर्जुन गेही, सिद्धिविनायक मुळे, संध्याताई देठे, शुभांगीताई देशपांडे, अरुणाताई जाधव, रवी अग्रवाल, राजेश जोशी, शिवराज जाधव, सय्यद इम्रान डोंगरसिंग साबळे, सोमेश काबलिये, शाम उगले, सतीश अकोलकर, ओम कळकुंबे, अमन मित्तल, तसेच इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ३०० वी जयंतीनिमित्त जुना जालन्यात धार्मिक कार्यक्रम

**जालना । प्रतिनिधी -** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी जालना महानगरच्या वतीने आज जुना जालना मंडळ येथील जागृतेश्वर महादेव मंदिर, पलंग बावडी, इंदिरानगर परिसरात विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात मंदिर, घाट व मठ परिसर स्वच्छता मोहिमेने करण्यात आली. त्यानंतर पारंपरिक शंखनाद आणि मंत्रोच्चारासह भव्य महाआरती करण्यात आली. वेदपठनाने परिसर आध्यात्मिकतेने भारून गेला. उपस्थित भक्तांनी भक्तीगीतांमधून अहिल्यादेवींच्या कार्याची आठवण केली.





भाजपा जालना महानगरचे जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यावर आधारित माहितीपूर्ण पत्रकांचे नागरिकांना वाटप केले. या पत्रकांमध्ये अहिल्यादेवींच्या दूरदृष्टीपूर्ण प्रशासन, समाजहिताची बांधिलकी, मंदिरांच्या जीर्णोद्धारासाठी घेतलेले प्रयत्न, स्त्री शिक्षण व सशक्तीकरणासाठी दिलेले योगदान यांचे सविस्तर वर्णन करण्यात आले होते. भास्कर आबा दानवे यांनी उपस्थित नागरिकांशी संवाद साधला आणि अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनचरित्र केवळ इतिहासापुरते मर्यादित न ठेवता, आजच्या समाजातही त्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. या उपक्रमाच्या माध्यमातून स्थानिक नागरिकांमध्ये अहिल्यादेवींच्या आदर्श नेतृत्व, निःस्वार्थ सेवा आणि भारतीय संस्कृतीतील योगदानाविषयी जागृती निर्माण करण्याचा मोलाचा प्रयत्न करण्यात आला. विशेषतः युवा पिढीला त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेता यावी, हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू होता. या कार्यक्रमास जालना महानगर जिल्ह्यातील अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी तसेच महिला पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभाग नोंदविला. यामध्ये स्थानिक नागरिकांचाही उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.

कार्यक्रम प्रसंगी बद्रिनाथ पठाडे, अशोक अण्णा पांगारकर, सोपान पेंढारकर, कपिल दहेकर, प्रा.राजेंद्र भोसले, महेश निकम, सुनिल खरे, अर्जुन गेही, सिद्धिविनायक मुळे, सुनिल पवार, संध्याताई देठे, शुभांगीताई देशपांडे, मनीषा भोसले, विद्याताई कुलकर्णी, सुनंदा बदनापूर, वैशाली बनसोडे, वंदना ढगे, सारिका पाटील, राजेश जोशी, सतीशचंद्र प्रभू, सुमित सुरडकर, सुहास मुंडे, डोंगरसिंग साबळे, मनोज इंगळे, सोमेश काबलिये, रमेश गोगडे, शाम उगले, सतीश अकोलकर, तसेच इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जालन्यात लोककला प्रशिक्षण शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्राच्या समृद्ध लोककला परंपरेशी विद्यार्थ्यांना जोडून त्यांच्या मनात या कलेबद्दल आवड निर्माण करण्याच्या उद्देशाने जालना येथे सुरू असलेल्या दहा दिवसीय लोककला प्रशिक्षण शिबिराला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

येथील जेईएस महाविद्यालयाचा लोककला विभाग आणि पिंपरी (डू.) येथील लोकपरिवर्तन बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर २५ मे रोजी सुरू झाले असून ते ५ जूनपर्यंत चालणार आहे.

**सखोल प्रशिक्षण आणि पारंपरिक वाद्यांचा समावेश**

या शिबिरात विद्यार्थ्यांना गण, शाहीरी, गोंधळ, जागरण, वासुदेव, भारुड आणि तमाशा यांसारख्या पारंपरिक लोककला प्रकारांचे सखोल प्रशिक्षण दिले जात आहे. विशेष म्हणजे, ढोलकी, संबळ, दिमडी, शाहीरी डफ, टाळ आणि तुणतुणे यांसारख्या लोकवाद्यांचे प्रशिक्षणही या शिबिराचा अविभाज्य भाग आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना लोककलेचा सर्वांगीण अनुभव घेता येत आहे.

**उद्घाटन आणि मान्यवरांची उपस्थिती**

या शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरस्वती भुवन महाविद्यालयाच्या निवृत्त संगीत विभाग प्रमुख सुलभा कुलकर्णी, डॉ. यशवंत सोनुने आणि डॉ. प्रा. वासुदेव उगले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. अग्निहोत्री यांनी यावेळी मार्गदर्शन करताना संगीताचे महत्त्व अधोरेखित केले. संगीत हे आपल्या आनंदासाठी आणि मानसिक बळासाठी अत्यंत उपयुक्त आहे. लोककला ही आपल्या मातीतील कला आहे आणि प्रत्येक विद्यार्थ्यांनी या कलेचे शिक्षण घेऊन तिचा वारसा पुढे नेणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

**उगले बंधूंचे विशेष मार्गदर्शन**

या शिबिराचे प्रमुख आकर्षण म्हणजे प्रा. कल्याण उगले आणि शाहीर रामानंद उगले या अनुभवी कलाकारांचे मार्गदर्शन. वयाच्या पाचव्या वर्षापासून गोंधळ परंपरेचे शिक्षण घेतलेल्या या उगले बंधूंनी 'झी मराठी'वरील 'संगीत सम्राट' आणि इतर अनेक टीव्ही कार्यक्रमांद्वारे लोककला महाराष्ट्रभर पोहोचवली आहे. त्यांचे अनुभव आणि कौशल्य शिबिरातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत मोलाचे ठरत आहे.

शिबिराच्या समारोपप्रसंगी विद्यार्थ्यांनी दहा दिवसांत शिकलेल्या विविध लोककला प्रकारांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. यामुळे, पालकांनी आपल्या पाल्यांना या शिबिरात सहभागी करून लोककलेमध्ये रुची निर्माण करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी प्रा. डॉ. यशवंत सोनुने आणि प्रा. कल्याण उगले यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

उदघाटण समारंभाचे सूत्रसंचालन आणि आभार शिबिर समन्वयक प्रा. कल्याण उगले यांनी मानले.

# पशुसंवर्धन मंत्र्यांच्या उपस्थितीत गौशाळा संचालकांचा मेळावा घेणार - भास्कर दानवे

**जालना । प्रतिनिधी -** गाईंचे पालन-पोषण, संवर्धनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने कल्याणकारी योजना राबविल्या असून गौपालकांच्या अडचणी, समस्या सोडविण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री तथा पालकमंत्री ना. पंकजाताई मुंढे यांच्या उपस्थितीत गौशाळा संचालकांचा मेळावा घेणार असल्याची माहिती भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष भास्करराव पाटील दानवे यांनी दिली.

श्री गोरक्षण पांजरापोळ गोशाळेत गौशाळा महासंघाचे संयोजक डॉ. सुनील सुर्यवंशी यांच्या हस्ते भास्करराव पाटील दानवे यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी पांजरापोळ गोशाळेचे अध्यक्ष घनश्यामदास गोयल हे होते. पांजरापोळ गोशाळेचे सचिव कैलास बियाणी, कोषाध्यक्ष विजय कामड, विश्वस्त महेंद्र भक्कड,विजय राठी, संजय लाहोटी, यांची प्रमुख उपस्थिती होती.





भास्करराव पाटील दानवे यांनी जालन्यात उद्योजक, व्यापारी बांधवांकडून सेवा भावनेने गाईंची सेवा केली जाते असे नमूद करत पांजरापोळ गोशाळेस आपले सहकार्य राहील अशी हमी दानवे यांनी दिली.

घनश्यामदास गोयल यांनी अध्यक्षीय समारोप केला. सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन कोषाध्यक्ष विजय कामड यांनी केले. कार्यशाळेत विलास तांगडे, उद्धव घुमरे, बन्सीधर आटोळे, गंगाधर सुरवसे, हरिश्चंद्र सूकोसे,गजानन घोडके, विवेक गाढे, विश्वनाथ घोडके, विष्णूकुमार चेचाणी, विजय बोडले, श्रीराम राठोड, भागवत डोंगरे, किसन बरडे, विष्णू आनंदे, भगवान उगले, भरत भांदरगे, रवींद्र मदने, आरगडे यांच्या सह गौशाळा संचालकांची उपस्थिती होती.

# देशाला स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांची गरज - विजय पवार



**जालना । प्रतिनिधी** - भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपले आयुष्य पणाला लावणारे हे विनायक दामोदर सावरकर आहे. सावरकरांनी वयाच्या १४ व्या वर्षी घरातील अष्टभुजा देवीसमोर मातृभूमीच्या मुक्ततेसाठी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून मारिता मारिता मरे तो झुंजेन अशी शपथ घेतली आणि ती पूर्ण देखील देखील केली. तरुणांनी सावरकरांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन प्रत्येकाच्या हृदयात आपल्या देशास्तव थोडीशी जागा ठेवा असे देखील माजी नगरसेवक विजय पवार म्हणाले.

बुधवार (दिनांक २८) रोजी हिंदुसंघटक विनायक दामोदर सावरकर यांच्या १४२ व्या जयंतीनिमित्त सावरकर प्रेमी मित्र मंडळाच्या वतीने विनम्र अभिवादन करून पांजरापोळ याठिकाणी गाईला चारा वाटप करण्यात आला त्यावेळी माजी नगरसेवक विजय पवार, अमित कुलकर्णी, संकेत मोहिदे, गणेश लोखंडे, अजिंक्य महाराज देशमुख, अनुराग संगमुळी, अमोल देशमुख आदींची उपस्थिती होती.







हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.